महाराष्ट्र शासन
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय रायगड-अलिबाग
दुरध्वनी क्रमांक :- ०२१४१-२२२११८/२२२०९७/२२२००१ फॅक्स क्रमांक: ०२१४१-२२२०२५/२२७४५१
Email :collector_raigad@maharshtra.gov.in Email dcraigad@gmail.com

---

क्र.साशा/कार्या-१/ब-५/आ.व्य./करोनाविषाणू/प्रतिबंधात्मक उपाययोजना/२०२० दि.०४/०४/२०२०

**तात्काळ**

प्रति,
विभाग नियंत्रक,
राज्य परिवहन महामंडळ,
रामवाडी पेण.

विषय :- नोव्हेल कोरोना विषाणू प्रसार रोखण्यासाठी उपाययोजना

संदर्भ:- मा.आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक,राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई यांचेकडील पत्र क्र. संआसे/कोरोना नियंत्रण कक्ष/परिवहन सेवा/२७९-२८०/२०२० दि.२७/०३/२०२०

राज्यातील कोरोना विषाणूंचा प्रसार रोखण्यासाठी सर्व शहरी व जिल्हास्तरावरुन युध्द पातळीवरुन कार्यवाही सुरु आहे. ग्रामीण भागातील रुग्णांची तपासणी व औषधोपचार करण्यासाठी जिल्हयातील शासकीय रुग्णालयांमध्ये काम करणारे सर्व अधिकारी व कर्मचारी यांना रुग्ण सेवेसाठी रुग्णालयात उपस्थित राहणे अत्यंत गरजेचे आहे. ग्रामीण भागातून रुग्णालयातील काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना दररोज त्यांच्या कामाचे ठिकाणी पोहोचण्यासाठी वाहतूकीची विशेष व्यवस्था उपलब्ध करणे आवश्यक आहे. खाजगी तसेच महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची वाहतूक व्यवस्था बंद आहे. आरोग्य विभागांतर्गत शासकीय रुग्णालयामंध्ये कार्यरत कर्मचाऱ्याना रुग्णालयापर्यंत ने-आण करण्यासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वाहनांची विशेष वाहतूक सेवा उपलब्ध करुन देणेबाबत जिल्हयातील डेपो व्यवस्थापक महाराष्ट्र परिवहन महामंडळ यांना सूचित करण्याबावत वर संदर्भात नमूद केलेल्या पत्रान्वये मा.आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक,राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई यांनी कळविले आहे. तरी सदर पत्रात नमूद केल्याप्रमाणे रायगड जिल्यात कुठे कुठे आवश्यकता आहे. याची माहिती जिल्हा शल्य चिकित्सक रायगड व जिल्हा आरोग्य अधिकारी रायगड यांचेकडून घेवून पूढील आवश्यक ती तात्काळ कार्यवाही करण्यात यावी. व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

सोबत संदर्भिय पत्राची पत्र जोडली आहे.

(निधी चौधरी)
**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी**
**रायगड-अलिबाग**

**माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी**

**प्रत:-** १) मा.आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक,राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई
२) मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड - अलिबाग
३) जिल्हा पोलिस अधिक्षक रायगड
४) जिल्हा शल्य चिकित्सक रायगड-अलिबाग
५)जिल्हा आरोग्य अधिकारी रायगड
६) उपविभागीय अधिकारी सर्व
७) तहसिलदार सर्व

Scanned by CamScanner